**गुरुराज नं २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित**
**(गंधर्वनगरी)**
**३०/अ, ४अ, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८.**

नोंदणी क्रमांक : एच एस जी (टी सी) / १०१ / १९९२-९३ दिनांक ४ जून १९९२.

**जावक क्रमांक : MC/2022/09/AGM/Proceedings/04**

**दिनांक : ११ . ०९ . २०२२**

---

## ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मसुदा

**फक्त सभासदांसाठी**

**विषय :** गुरुराज नंबर २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित (गंधर्व नागरी) २७. ०३. २०२२ रोजी झालेल्या ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त पत्रक.

आपल्या सोसायटीच्या / संस्थेच्या दिनांक २७. ०३. २०२२ रोजी संपन्न झालेल्या ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मसुदा सोबत जोडत आहोत. या संदर्भात सभासद आपला अभिप्राय, हरकती, आक्षेप किंवा काही सूचना असतील तर, आपण लेखी स्वरुपात दिनांक २४. ०९. २०२२ पर्यंत (लेखी स्वरूपात) सोसायटी ऑफिसच्या पत्र पेटीत टाकाव्यात किंवा ईमेल द्वारे कळवावे ही विनंती. (gururajno2.gandharva@gmail.com)

| | | |
|---|---|---|
| (समीर पुणेकर) | V.H. Deshpande<br>(वैभव देशपांडे) | (विक्रमसिंह देसाई) |
| **सचिव** | **खजिनदार** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापकीय समिती** | **व्यवस्थापकीय समिती** | **व्यवस्थापकीय समिती** |

Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit ★ Regn. No. PNA/HSG/(T.C.)/ 101/92-93 DT. 4-6-92

आपल्या उपरोक्त संस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा 'झूम मीटिंग' Zoom Meeting (Virtual Online Meeting Platform) वर रविवार दिनांक २७ मार्च २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली. या सभेस एकूण ५४ सभासद उपस्थित होते.

**विषय क्रमांक १ :** दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहणे.

अध्यक्ष्यांनी या सभेसाठी उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले व त्यांनंतर सर्व सभासदांनी मागील वर्षात निधन झालेल्या खालील नमूद केलेल्या दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहून सभेच्या कामकाजास सुरवात केली.

- श्रीमती मोघे सुशीला शंकर -ए १३
- श्री. बळवंत बोकील - बी ३३
- श्री. भागवत सदाशिव दत्तात्रय - बी १४
- श्री. साळुंखे गोविंद - डी २१
- श्री. अण्णाप्पा कुलकर्णी - सी ३१
- श्री. गोवंडे मधुकर हरी - एफ १४

**विषय क्रमांक २ :** दिनांक १४ मार्च २०२१ रोजी झालेल्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून त्यावर चर्चा करून कायम करणे.

अध्यक्ष्यांनी दिनांक १४ मार्च २०२१ रोजी झालेल्या २९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभेमध्ये सर्वांना वाचून दाखवल्यानंतर खालील ठराव मंजूर करण्यात आला.

"दिनांक १४ मार्च २०२१ रोजी झालेल्या २९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त या ठरावाने मंजूर व कायम करण्यात येत आहे."

सूचक:- श्री समीर पुणेकर (सचिव) अनुमोदक :- श्री वैभव देशपांडे (खजिनदार)

"ठराव सर्वानुमते मंजूर"

Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit
Regn. No. PNA/HSG/(T.C.)/101/92-93 DT. 4-6-92

**विषय क्रमांक ३ :** आर्थिक वर्ष २०२०-२१ चे जमा-खर्च पत्रक व ताळेबंद याला मंजुरी देणे.

खजिनदारांनी संस्थेचे २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे जमाखर्चपत्रक व ताळेबंद सभेत सादर करून त्यास अंतिम मंजुरी देण्याची विनंती केली. तसेच संस्थेचे २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणदेखील झाले असल्याने जमाखर्चपत्रक व ताळेबंद मंजुरीस हरकत नसल्याचे स्पष्ट केले. यावरील चर्चेमध्ये सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना खजिनदारांनी सविस्तर उत्तरे दिल्यानंतर खालील ठराव मंजूर करण्यात आला.

"संस्थेच्या २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा जमाखर्च व ताळेबंद यांस या ठरावाने अंतिम मंजुरी देण्यात येत आहे."

या ठरावाला जोडूनच मा. खजिनदार श्री. वैभव देशपांडे यांनी पुढील तीन प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मांडले -

१) आर्थिक वर्ष २०२०-२१ चा वाढावा रु. ५,६५,२७९.७७ च्या २५ % रक्कम राखीव निधीला वर्ग करावी. ही रक्कम रु. १,४१,३१९.९४ होते. त्यामुळे १००० च्या पटीत गुंतवणूक करणे सोपे व्हावे यासाठी रु. १,४२,००० एवढ्या रकमेची गुंतवणूक करावी.

२) बांधकाम खर्चाच्या ०.२५ % एवढी रक्कम सिंकिंग फंडात वर्ग करावी. त्यासाठी दर वर्षीप्रमाणे एकरकमी रु. ५०,००० सिंकिंग फंडात वर्ग करावेत.

३) आर्थिक वर्ष २०२०-२१ चा शिल्लक वाढावा रु. ३,७३,२७९.७७ पुढे ओढून घेण्यात यावा.

वरील तीनही प्रस्तावांसह ठराव सर्वानुमते मंजूर / संमत करण्यात आला.

सूचक:- श्री वैभव देशपांडे (खजिनदार)    अनुमोदक :- श्री विक्रमसिंह देसाई (अध्यक्ष)

**विषय क्रमांक ४ :** आर्थिक वर्ष २०२०-२१ चे मा. लेखापरीक्षक श्री. अशोक ए मारणे यांचेकडून प्राप्त झालेल्या लेखा परिक्षण अहवालाची नोंद घेणे.

खजिनदारांनी संस्थेचे २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या हिशोबाचे लेखापरीक्षण श्री. अशोक ए. मारणे या प्रमाणित लेखापरीक्षकाकडून करून घेण्यात आले असून त्यांनी संस्थेस "अ" दर्जा



Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit ★ Regn. No. PNA/HSG/(T.C.)/ 101/92-93 DT. 4-6-92

दिल्याचे सभेत सांगून लेखापरीक्षण अहवाल सभेत सादर केला. त्यावर चर्चा झाल्यानंतर खालील ठराव मंजूर करण्यात आला.

"संस्थेच्या २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद या ठरावाने घेण्यात येत असून दोषदुरुस्ती अहवाल सादर करण्यासही या ठरावाने मंजुरी देण्यात येत आहे."

सूचक:- श्री वैभव देशपांडे (खजिनदार) अनुमोदक :- श्री समीर पुणेकर (सचिव)

"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रमांक ५ :** आर्थिक वर्ष २०२०-२१ लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची (O-Form) नोंद घेऊन तो संबंधीतास पाठवण्यास मंजुरी देणे.

अध्यक्षांनी लेखापरीक्षण अहवालातील सूचना वाचून दाखविल्या आणि सांगितले की, सर्व सूचनांवर आपण योग्य ती कारवाई केली आहे. याला सर्व सभासदांनी सहमती दर्शवली.

ठराव सर्वानुमते मंजुर / संमत करण्यात आला.

**विषय क्रमांक ६ :** आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या लेखा परिक्षणासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.

अध्यक्ष्यांनी संस्थेचे २०१९-२०, २०२०-२१ या दोन आर्थिक वर्षांचे लेखापरीक्षण श्री. अशोक ए. मारणे या प्रमाणित लेखापरीक्षकांकडून करून घेण्यात आले असल्याने २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी सुद्धा श्री.अशोक ए. मारणे यांची नियमांनुसार सलग ०३ वर्ष नियुक्ती करता येऊ शकते असे मत मांडले.

लेखापरीक्षक श्री. अशोक मारणे यांचे आपल्या संस्थेच्या लेखापरीक्षणाचे हे तिसरे वर्ष असून पुढच्या वर्षी आपल्याला नवीन लेखापरीक्षक नेमावाच लागणार असल्याने या वर्षी श्री. मारणे यांनाच नियुक्त करावे; पुढच्या वर्षी नवीन लेखापरीक्षक नियुक्त करू, असे मत अध्यक्ष श्री. विक्रमसिंह देसाई यांनी व्यक्त केले. याला सभेने सहमती दर्शवली. "संस्थेच्या २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या हिशोबाचे लेखापरीक्षण करण्यासाठी श्री.अशोक ए. मारणे या प्रमाणित



Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit ★ Regn. No. PNA/HSG/(T.C.)/ 101/92-93 DT. 4-6-92

लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यास व या लेखापरीक्षणासाठी नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या मानधनाची रक्कम त्यांना देण्यास या ठरावाने मंजुरी देण्यात येत आहे."

सूचक:- श्री विक्रमसिंह देसाई (अध्यक्ष)      अनुमोदक :- श्री वैभव देशपांडे (खजिनदार)

"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रमांक ७ :** आर्थिक वर्ष २०२२-२३ चे अंदाजपत्रक मांडणे व त्यावर चर्चा करून त्यास मंजुरी घेणे.

मा. सचिव श्री. समीर पुणेकर यांनी सांगितले की, संस्थेचे काही खर्च हे खूपच मोठे असून त्यांच्या एकूण खर्चाविषयी अजून अनिश्चितता आहे. उदा. टाकी दुरुस्ती, ड्रेनेज दुरुस्ती, बिल्डिंग लीकेज, इ. आणि बाकीचे खर्च हे किरकोळ स्वरूपाचे असून त्यात अत्यंत किरकोळ स्वरूपाची वाढ असेल. त्यामुळे या वर्षी असे अंदाज पत्रक मांडणे अशक्य झाले. पुढील वर्षी त्यांचा विचार करून अंदाजपत्रक मांडण्याचा प्रयत्न करू.

याला सर्वसाधारण सभेने सहमती दर्शविली.

सूचक:- श्री समीर पुणेकर (सचिव)      अनुमोदक :- श्री वैभव देशपांडे (खजिनदार)

**विषय क्रमांक ८ :** दिनांक ०१/१०/२०१९ ते ०१/०३/२०२२ ह्या कालावधी मध्ये व्यवस्थापन समिती, प्रशासकीय समिती तसेच प्रशासक अधिकारी (प्राधिकृत अधिकारी) यांनी मंजूर केलेल्या फ्लॅट हस्तांतरण प्रकरणास तसेच नवीन सभासदस्यत्व देणे यांस अंतिम मंजुरी देणे.

अध्यक्षांनी यावर बोलताना सांगितले की, वेगवेगळ्या प्रकारची ७ हस्तांतरण प्रकरणे आहेत. त्यांच्या हस्तांतरणास सर्वसाधारण सभेने मंजुरी द्यावी.

१. B - ३३ - श्री. बळवंत वामन बोकील : श्रीमती शुभांगी बळवंत बोकील, राजेंद्र बळवंत बोकील व चंद्रशेखर बळवंत बोकील - मृत्यूनंतर वारस नोंद.
२. D - २१ - श्री. गोविंद रामचंद्र साळुंखे - महेश गोविंद साळुंखे बक्षीस पत्र (Gift Deed)
३. D - ३२ - श्री. गोविंद रामचंद्र साळुंखे - सुनील गोविंद साळुंखे बक्षीस पत्र (Gift Deed)
४. D - २३ - श्री. राजेश रामदास तापकीर - सौ माधुरी सास्तुरकर - खरेदी विक्री व्यवहार (Sales Deed)
५. E - १२ - श्री. विभाकर खरे - सौ. मनीषा विक्रमसिंह देसाई व विक्रमसिंह सुरेश देसाई - खरेदी विक्री व्यवहार (Sales Deed)



Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit ★ Regn. No. PNA/HSG/(T.C.)/ 101/92-93 DT. 4-6-92

६. G - १४ - श्रीमती लक्ष्मीबाई वीरप्पा बैकन - श्री. रमेश वीरप्पा बैकन - हक्क सोड पत्र (Release Deed).
७. H - १२ सौ. सुषमा सुनील रावळे - श्री. शिवाजी मधुकर पाटील व सौ. चित्रा शिवाजी पाटील - खरेदी विक्री व्यवहार (Sales Deed)

उपरोक्त संदर्भात मत व्यक्त करताना अध्यक्षांनी असे सांगितले कि श्री. बोकील आणि श्री. साळुंखे या व्यतिरिक्त सर्व हस्तांतरण प्रकरणे ही, प्रशासकीय अधिकारी यांच्या काळातील असल्याने आणि नंतर आलेल्या प्रशासकीय समितीला हस्तांतरण अधिकार नसल्याने, या सर्वसाधारण सभेसमोर ही प्रकरणे ठेवण्यात येत आहेत. या सर्व प्रकरणात योग्य ती कागदपत्रे सोसायटी दप्तरी सादर करण्यात आली आहेत, तरी सर्वसाधारण सभेत या हस्तांतरण प्रकरणांना मंजुरी द्यावी.

यानंतर सभेस उपस्थीत सर्व सभासदांनी सर्व हस्तांतरण प्रकरणांना सर्वानुमते मंजुरी दिली.

सूचक:- श्री समीर पुणेकर (सचिव) अनुमोदक :- श्री वैभव देशपांडे (खजिनदार)

**विषय क्रमांक ९ :** गुरुवार दिनांक २४ मार्च २०२२ पर्यंत सभासदांकडून आलेल्या लेखी सूचनांचा विचार करणे. सभासदांनी लेखी सूचना ऑफिस पेटीत टाकणे किंवा ई-मेल द्वारे पाठवणे (gururajno2.gandharva@gmail.com)

गुरुवार दि. २४ मार्च २०२२ पर्यंत सभासदांकडून आलेल्या लेखी सूचनांचा विचार करणे.
श्रीमती सुचिता महाडिक, श्री. रघुनाथ जोशी, सौ. मृणालिनी देसाई, श्री. गोठेवरेकर, श्री. ओक, श्री. वाळुंजकर या माननीय सभासदांनी पाठवलेल्या लेखी पत्रांचा अध्यक्षांनी आढावा घेतला. इमारत गळती, टाकी गळती, ड्रेनेज समस्या इत्यादी संदर्भात पत्रांत असलेल्या सूचनांचा आढावा घेतला. तसेच सर्वांच्या पत्रांचा मुख्य आशय हा, रीडेव्हलपमेंट लवकरात लवकर करावे, असा असल्याचे सांगितले. तसेच श्री. चिंचवले यांनी पाठवलेल्या पत्राचाही अध्यक्षांनीआढावा घेतला. त्यांनी पत्रात उपस्थित केलेल्या मुद्द्यांना अध्यक्षांनी सविस्तर उत्तरे दिली.

**विषय क्रमांक १० :** पोट-नियमाप्रमाणे दर साल दर शेकडा २१% याप्रमाणे थकीत वर्गणीवर विलंब आकार घेण्याबाबत निर्णय घेणे.

सहकारी संस्था पोटनियमाप्रमाणे दर साल दर शेकडा २१ % याप्रमाणे थकीत वर्गणीवर विलंब आकार घेण्याबाबत निर्णय घेणे.



Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit ★ Regn. No. PNA/HSG/(T.C.)/ 101/92-93 DT. 4-6-92

"संस्थेच्या सभासदांनी मासिक वर्गणी जर महिन्याच्या १० तारखे नंतर दिली तर सध्या करण्यात येणाऱ्या रुपये १००/- दरमहा इतक्या दंड आकारणी ऐवजी, रुपये २०/- दरमहा इतकी दंड आकारणी करण्यास या ठरावाने मंजुरी देण्यात येत आहे. रुपये २०/- दर महा ही दंड आकारणी एप्रिल २०२२ पासून लागू होईल," असा ठराव मांडून खजिनदार श्री. वैभव देशपांडे म्हणाले की, ७००/- रुपयावर एका महिन्याचे दर साल दर शेकडा २१% या दराने खरे तर १२.२५ रुपयेच होतात. परंतु सभासदांना, कॅल्क्युलेट करणे व भरणे सोपे जावे म्हणून केवळ प्रॅक्टिकल ॲडजस्टमेंट (Practical Adjustment) म्हणून रुपये २०/- दरमहा आकारण्याची परवानगी सर्वसाधारण सभेने द्यावी.
यावर मा. सभासद श्री. सी. पी. लिमकर यांनी मत व्यक्त केले की, २० रु. दरमहा ही विलंब शुल्क आकारणी सुद्धा दसादशे २१ % पेक्षा जास्त होते. याचा विचार करावा.यावर मा. सभासद श्री. केंकरे यांनी सुचवले की, दरमहा रु. १२ अशीच विलंब शुल्क आकारणी करावी. त्यामुळे मासिक देखभाल वर्गणी त्या महिन्याच्या १० तारखेनंतर दिल्यास रु. १२ दरमहा अशी विलंब शुल्क आकारणी करावी, यास सर्वसाधारण सभेने सर्वानुमते अंतिम मंजुरी दिली.

सूचक:- श्री वैभव देशपांडे (खजिनदार) अनुमोदक :- श्री मंगेश केंकरे

मा. सभासद श्री. एस. बी. जोशी यांनी या ठरावावर बोलताना विचारले की, श्री. सुनील चौधरी यांच्याकडून येणे असलेल्या थकबाकीचा या ठरावाशी काही संबंध आहे का ?
याला उत्तर देताना मा. सचिव श्री. पुणेकर यांनी सभेला सांगितले की, सुनील चौधरी थकबाकी हा विषय आपण competent third party कडे सोपवू या आणि त्यांचे मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करूया. याला सुद्धा सर्वसाधारण सभेने सर्वानुमते मान्यता दिली.

**विषय क्रमांक ११ :** व्यवस्थापन वार्षिक वर्गणी एकरकमी देणाऱ्या सभासदांना वार्षिक रुपये ४००/- सूट देण्याबाबत चर्चा करणे व निर्णय घेणे.

"संस्थेची वार्षिक देखभाल वर्गणी एक रकमी १० एप्रिल पर्यंत देणाऱ्या सभासदांना वार्षिक ४००/- रुपये सूट देण्यास या ठरावाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे. ही सूट सेवा शुल्कातून म्हणजे मेंटेनन्स चार्जेस (Maintenance Charges) मधून देण्यात येईल," असा ठराव खजिनदार यांनी सभेसमोर मांडला.
ठरावावर विविध सभासदांनी आपली मते व्यक्त केली आणि अध्यक्ष महोदयांनी सर्वांचे शंकानिरसन केले. यानंतर या ठरावाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

सूचक:- श्री वैभव देशपांडे (खजिनदार) अनुमोदक :- श्री विक्रमसिंह देसाई (अध्यक्ष)



Gurnraj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit ★ Regn. No. PNA/HSG/(T.C.)/ 101/92-93 DT. 4-6-92

यावरील उपरोक्त विषयावर अध्यक्षांनी असे मत मांडले की उपविधीतील तरतुदींप्रमाणे व नियमानप्रमाणे संस्थेच्या मालमत्तेची देखभाल दुरुस्ती करावयाची असल्यास उपविधीमध्ये नमूद केलेली निविदा प्रक्रिया ही पार पाडावी लागते तदनुसार यामधील तज्ञ लोकांचा सल्ला घेऊन निविदा प्रक्रिया राबवून पाण्याच्या टाकीची गळती रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. यावरील चर्चेमध्ये सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना पदाधिकाऱ्यांनी सविस्तर उत्तरे दिल्यानंतर खालील ठराव मंजूर करण्यात आला.

"संस्थेच्या ए इमारतीवरील पाण्याच्या टाकीमधून होणारी गळती रोखण्यासाठी तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेऊन व उपविधीतील तरतुदींनुसार व नियमांनुसार निविदा प्रक्रिया पार पाडून पाण्याच्या टाकीची गळती रोखण्याचे काम करून घेण्यात यावे तसेच पाण्याच्या टाकीची देखभाल दुरुस्तीचा खर्च हा जास्त असल्याने व वारंवार करावा लागत असल्याने यावर उपाय म्हणून संस्थेच्या सर्व इमारतींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करून या समस्येवरती ठोस उपाययोजना करण्यास या ठरावाने अंतिम मंजुरी देण्यात येत आहे."

सूचक:- श्री विक्रमसिंह देसाई (अध्यक्ष) अनुमोदक :- श्री समीर पुणेकर (सचिव)

**विषय क्रमांक १५ :** शासनाच्या नियमाप्रमाणे ३० वर्षांपुढील इमारतींचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) दर ३ वर्षांनी करून घेणे बंधनकारक असल्याने, सोसायटी इमारतींचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) करून घेण्यास चर्चा करून खर्चास मंजुरी घेणे.

वरील उपरोक्त विषयासंदर्भात मत व्यक्त करताना अध्यक्षांनी असे मत व्यक्त केले की शासनाच्या नियमांप्रमाणे व उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेकडून ३० वर्षांपेक्षा जास्त जुन्या इमारतींचे बांधकाम लेखापरीक्षण दर ०३ वर्षातून एकदा करून घेणे बंधनकारक आहे व त्यावर चर्चा करून खालील ठराव मंजूर करण्यात आला.

"संस्थेच्या सर्व इमारतींचे बांधकाम लेखापरीक्षण शासनाच्या निर्णयाप्रमाणे व उपविधीतील तरतुदीनुसार उपविधी क्र. ७६ (अ) प्रमाणे तीस वर्षांपेक्षा जास्त जुन्या इमारतींसाठी दर तीन वर्षातून एकदा करणे बंधनकारक असून पण त्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम ही जास्त असल्याकारणाने त्या ऐवजी संस्थेच्या सर्व इमारतींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करून या समस्येवर उपाययोजना करण्यात यावी."

सूचक:- श्री समीर पुणेकर (सचिव) अनुमोदक :- श्री विक्रमसिंह देसाई (अध्यक्ष)



Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit
Regn. No. PNA/HSG/(T.C.)/ 101/92-93 DT. 4-6-92

**विषय क्रमांक १६ :** पुनर्विकास कामाचा आढावा घेणे व पुढील कार्यवाहीची रूपरेषा ठरवणे.

वरील उपरोक्त विषयासंदर्भात सभेस उपस्थित सर्व सभासदांनी संस्थेच्या सर्व इमारतीच्या पुनर्विकासाची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी व त्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही करावी असे मत मांडले. तसेच अध्यक्ष्यांनी दि. ०४ जुलै २०१९ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे संस्थेच्या सर्व इमारतींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया पार पाडण्यात येईल व त्या अनुषंगाने लवकरात लवकर विशेष सर्वसाधारण सभा घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सर्व सभासदांना सांगितले.

सूचक:- श्री विक्रमसिंह देसाई (अध्यक्ष) अनुमोदक :- श्री समीर पुणेकर (सचिव)

**विषय क्रमांक १७ :** ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे

वरील उपरोक्त विषयासंदर्भात सभेस उपस्थित सर्व सभासदांना काही प्रश्न असल्यास ते विचारावेत असे आवाहन अध्यक्ष्यांनी केले त्यावर सभेस उपस्थित सर्व सभासदांनी काहीही प्रश्न नसल्याचे सांगितले.

**विषय क्रमांक १८ :** सर्व सभासदांचे आभार प्रदर्शन

त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष,सचिव आणि खजिनदार यांनी संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या वतीने सभेस उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले आणि सभा संपल्याचे जाहीर करून सभेची सांगता केली.

| | | |
|---|---|---|
| | V.H. Deshpande | |
| (समीर पुणेकर) | (वैभव देशपांडे) | (विक्रमसिंह देसाई) |
| **सचिव** | **खजिनदार** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापकीय समिती** | **व्यवस्थापकीय समिती** | **व्यवस्थापकीय समिती** |

Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit ★ Regn. No. PNA/HSG/(T.C.)/ 101/92-93 DT. 4-6-92